# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 20/09/2023 (बुधवार) सकाळ


### मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण यांनी पोलीस स्टेशन कन्हान येथील गणपती स्थापना बंदोबस्ताचा घेतला आढावा तसेच विसर्जनस्थळाची केली पाहणी

सन २०२३ मध्ये सार्वजनिक गणेशोत्सव दिनांक १९/०९/२०२३ रोजी पासुन मोठया उत्साहात सर्वत्र साजरा होत असुन त्यामध्ये नागपूर ग्रामीण पोलीस दलाकडुन सार्वजनिक गणपती उत्सव मोठया आनंदात साजरा होण्याकरीता बंदोबस्ताची विशेष पुर्व तयारी करण्यात आली आहे. दिनांक १९/०९/२०२३ रोजी नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से) यांनी पोस्टे कन्हान येथील बंदोबस्ताचे ठिकाणी भेट देवुन गणपती स्थापना बंदोबस्ताचा आढावा घेतला तसेच कन्हान नदीचे काठावरील कालीघाट मंदीर विसर्जन स्थळी भेट दिली. कालीघाट मंदीर कन्हान त्या ठिकाणी कन्हान तसेच नागपूर शहर हद्दीतील भाविक मोठया प्रमाणात गणपती विसर्जन करणार आहे. मा. पोलीस अधीक्षक यांनी तेथील सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेतला व बंदोबस्ताबद्दल पोलीस स्टेशन कन्हान येथील अधिकारी व अंमलदार यांना मार्गदर्शन केले. छोटे गणपती हे कृत्रिम तलावात विसर्जित करावे व शासनाकडुन समन्वय साधुन गणपती विसर्जनाकरीता कृत्रिम तलाव तयार करून घ्यावे याबाबत सुचना दिल्या.





पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर